स्थानिक स्वराज्य संस्थांतील
प्राथमिक शाळांत शिक्षक देण्याचे
नवे मान्य निकष.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक पीआरई ७०७८/(२१८२) सात,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक २८ ऑगस्ट, १९८०

पहावे :- १) शासन परिपत्रक, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्रमांक पीआरई ७०७५/सात/६७७, दिनांक ५।३।१९७६
२) शासन निर्णय, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्रमांक पीआरई ७०७५/सात, दिनांक ३।५।१९७६.
३) शासन परिपत्रक, शिक्षण व युवक सेवा विभाग, क्रमांक -पीआरई १०७६ सात, दिनांक २०।१२।१९७६.
४) शासन निर्णय शिक्षण व युवक सेवा विभाग, क्रमांक पीआरई ७०७६/२५४२६/(१३५१) सात, दिनांक ५।५।१९७७.

## शा स न नि र्ण य

वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या शासकीय आदेशात बदल करुन, या आदेशास जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्राथमिक शाळांस शिक्षक देण्याचे नवे निकष मंजूर करण्यात येत आहेत. या पुढे या शाळांकरिता प्राथमिक शिक्षकांची संख्या निर्धारित करताना हे निकष लावण्यात यावेत.

२. संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी या नव्या निकषाप्रमाणे त्यास देय होणाऱ्या प्राथमिक शिक्षकांच्या जागांची संख्या निर्धारित करुन ती शिक्षण संचालक, पुणे यांस कळवावी. याप्रमाणे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेस या नव्या निकषाप्रमाणे देय असलेल्या प्राथमिक शिक्षकांची संख्या निर्धारित झाल्यानंतर अशी संख्या जर संबंधित निवड मंडळाकडून नियमानुसार निवड होऊन नेमणूक झालेल्या व सध्या काम करीत असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे जे असे शिक्षक (म्हणजे संबंधीत निवड मंडळाकडून निवड झालेले व योग्यरितीने नेमलेले शिक्षक) अतिरिक्त ठरविण्यात आले आहेत त्यास नियमित जागेवर सामावून घेण्यास स्थानिक स्वराज्य संस्थांस शिक्षण संचालकांनी परवानगी द्यावी. याप्रमाणे सध्या अतिरिक्त असलेले शिक्षक नियमित झाल्यानंतर प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सध्या प्रत्यक्ष काम करीत असलेल्या शिक्षकांची जी संख्या होईल त्या संख्येत काही जागा निर्माण झाल्यास त्या भरण्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांस परवानगी असावी. मात्र योग्य त्या निवड मंडळाकडून निवड झालेले व सध्या प्रत्यक्ष कामावर असलेले जेवढे एकूण शिक्षक स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सध्या काम

करीत आहेत. त्यापेक्षा अधिक शिक्षकांच्या जागा निर्माण करण्यास अथवा अधिक शिक्षकांच्या नेमणुका करण्यास चालू वर्षी म्हणजे १९८०-८१ या वर्षी स्थानिक स्वराज्य संस्थास परवानगी असणार नाही.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांना या नव्या निकषाप्रमाणे वाढीव किती शिक्षक जादा शिक्षक पदे लागतील त्याबाबतचा आढावा शिक्षण संचालकांनी घ्यावा व प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेकडे योग्य रितीने मंजूर केलेल्या व सध्या रिकाम्या असलेल्या जागांची संख्या काढावी. तसेच रिकाम्या असलेल्या मंजूर जागांपैकी किती जागा भरण्यास परवानगी देणे आवश्यक आहे आणि त्याकरिता येणारा जादा खर्च कसा भागविता येईल याच्या तपशिलासह शिफारस करावी.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १८७४/८०/व्यय-५, दिनांक २८।७।१९८० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

( सही/- xxxxxx

व. के. जोशी

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

## विवरणपत्र

**स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्राथमिक शाळांत शिक्षक देण्याचे नवे मान्य निकष :**

(अ) यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांत शिक्षक देण्याकरिता जी जी विद्यार्थी संख्या लक्षात घेण्यात येईल ती प्रत्येक शाळा हा एक घटक धरून लक्षात घेण्यात यावी. म्हणजे यापुढे शिक्षकांची संख्या ठरविण्याकरिता जिल्हा हा घटक न धरता प्रत्येक शाळा हा घटक धरण्यात यावा.

(ब) या प्राथमिक शाळांतील शिक्षकांची संख्या निर्धारित करण्याकरिता विद्यार्थ्यांची जी पटसंख्या अथवा सरासरी हजेरी (म्हणजे उपस्थिती) (जेथे लागू असेल ती) धरावयाची आहे, ती सप्टेंबर महिन्यातील असावी.

(क) जिल्हा परिषदांतील व "क" वर्ग नगरपरिषदांच्या ताब्यातील प्राथमिक शाळांसाठी खालीलप्रमाणे शिक्षकांची संख्या निर्धारित करण्यात यावी :—

(१) प्रत्येक एक शिक्षकी शाळेस एक शिक्षक

(२) बहुशिक्षकी शाळांतील इयत्ता १ ते ४ करिता खालीलप्रमाणे शिक्षक देण्यात यावेत :—

| विद्यार्थ्यांची पटसंख्या | सरासरी हजेरी ( उपस्थिती ) | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ४० पर्यन्त | — | १ |
| ४१ — ८० | — | २<br>विद्यार्थ्यांची पटसंख्या ८० पेक्षा जास्त असूनही सरासरी हजेरी (उपस्थिती) ६० पेक्षा जास्त नसल्यास दोनपेक्षा जास्त शिक्षक मिळणार नाहीत. |
| ८१ — १२० | ६० पेक्षा जास्त | ३ |
| १२१ — १६० | ९० पेक्षा जास्त | ४ |
| १६१ — २०० | १२० पेक्षा जास्त | ५ |

याप्रमाणे पुढील शिक्षकांची संख्या निर्धारित करण्यात यावी.

(३) इयत्ता ५ ते ७ करिता खालीलप्रमाणे शिक्षक देण्यात यावेत :—

( २/— )

इयत्ता ५ ते ७ च्या प्रत्येक वर्गाकरिता १.२ शिक्षक याप्रमाणे शिक्षक खाली नमूद केलेल्या अटीवर देण्यात यावेत :-

बिगर आदिवासी विभागाकरिता याप्रमाणे शिक्षक देताना इयत्ता ५, ६ व ७ मधील विद्यार्थ्यांच्या सरासरी हजेरीचे (उपस्थितीचे) प्रमाण अनुक्रमे २०, १५, १५ असे असावे. विद्यार्थ्यांच्या सरासरी हजेरीचे प्रमाण या वर्गातून याप्रमाणे असेल तरच इयत्ता ५ ते ७ च्या प्रत्येक वर्गाकरिता १.२ याप्रमाणे शिक्षक देय होतील.

आदिवासी विभागात विद्यार्थ्यांचे सरासरी हजेरीचे (उपस्थितीचे) हे प्रमाण इयत्ता ५, ६ व ७ करिता अनुक्रमे १५, १०, १० असे असावे. विद्यार्थ्यांच्या सरासरी हजेरीचे प्रमाण या वर्गातून याप्रमाणे असेल तरच इयत्ता ५ ते ७ च्या प्रत्येक वर्गाकरिता १.२ याप्रमाणे शिक्षक देय होतील.

या वर्गातून म्हणजे इयत्ता ५ ते ७ मध्ये, वर नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांची सरासरी हजेरी (म्हणजे उपस्थिती) नसेल तर इयत्ता ५ ते ७ या तिन्ही इयत्तांच्या तुकड्यास मिळून बिगर आदिवासी विभागामध्ये ४० विद्यार्थ्यांस दोन शिक्षक व आदिवासी विभागात ३० विद्यार्थ्यांस दोन शिक्षक याप्रमाणे या वर्गातील विद्यार्थ्यांच्या सरासरी हजेरीवर (म्हणजे उपस्थितीवर) शिक्षक देण्यात यावेत.

(ड) शहरी विभागातील म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका सोडून इतर महानगरपालिका व "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील प्राथमिक शाळांसाठी खालीलप्रमाणे शिक्षकांची संख्या निर्धारित करण्यात यावी :-

(१) प्रत्येक एक शिक्षकी शाळेस एक शिक्षक.

(२) बहुशिक्षकी शाळांतील इयत्ता १ ते ४ करिता खालीलप्रमाणे शिक्षक देण्यात यावेत :-

| विद्यार्थ्यांची पटसंख्या | सरासरी हजेरी (उपस्थिती) | शिक्षक संख्या |
|---|---|---|
| ५० पर्यंत | - | १ |
| ५१ ते १०० | - | २ |
| | | विद्यार्थ्यांची पटसंख्या १०० पेक्षा जास्त असूनही सरासरी हजेरी (उपस्थिती) ८० पेक्षा जास्त नसल्यास दोनापेक्षा जास्त शिक्षक मिळणार नाहीत. |
| १०१ ते १५० | ८० पेक्षा जास्त | ३ |
| १५१ ते २०० | १२० पेक्षा जास्त | ४ |

(३/-)

२०१ ते २५० १६० पेक्षा जास्त

याप्रमाणे पुढील शिक्षकांची संख्या निर्धारित करण्यात यावी.

(२) इयत्ता ५ ते ७ करिता खालीलप्रमाणे शिक्षक देण्यात यावेत :–

शहरी विभागात इयत्ता ५, ६ व ७ या प्रत्येक वर्गाची सरासरी हजेरी (उपस्थिती) १० असेल तर या वर्गाकरिता प्रत्येक वर्गास १.२ याप्रमाणे शिक्षक देण्यात यावेत.

या वर्गातून म्हणजे इयत्ता ५ ते ७ मधे वर नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांची सरासरी हजेरी (म्हणजे उपस्थिती) नसेल तर इयत्ता ५ ते ७ या तिन्ही इयत्तांच्या तुकड्यास मिळून १० विद्यार्थ्यांस दोन शिक्षक याप्रमाणे या वर्गातील विद्यार्थ्यांच्या सरासरी हजेरीवर (म्हणजे उपस्थितीवर) शिक्षक देण्यात यावेत.

२५१ ते ३०० – २०० पेक्षा जास्त

३०१ ते ३५० – २५० (पेक्षा)

३५१ ते ४०० २५०

४०१ ते ४५० ३००

४५१ ते ५०० (३५० पेक्षा जास्त)

५०१ ते ५५०

५५१ ते ६००

२ पै नां

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक- २३७९ सन१९८६-८७
पुणे, दिनांक- १८।७।८६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख;
बापूसाहेब पवार प्राथमिक शाळा
३८० भवानी पेठ, पुणे २. यांस-

विषय-जादा वर्ग तुकडीस परवानगी मिळणेबाबत

संदर्भ-१) आपले पत्र क्रमांक- ११४ / दिनांक- ८/५/१९८६
२) शि. मं. ठराव क्रमांक ७८ / दिनांक ३०/६/१९८६

उपरोक्त विषयाबाबत तुमचे संदर्भांकित पत्रानुसार तुमचे शाळेस माहे....जून.... सन....१९८६......पासून इयत्ता....२री.....चा एक जादा वर्ग सुरु करणेस खालील शर्तीवर मान्यता देण्यात येतआहे.

१)शासकीय नियमानुसार प्रशिक्षित शिक्षक/शिक्षिका नेमण्याची व्यवस्था करावी.

२)सदर सेवकांचे वय शासन नियमानुसार असावे.

३)शासन नियमानुसार मागासवर्गीयांचे प्रमाण सदर शिक्षक नेमताना पूर्ण करावे.

४)सदर वर्गात नियमाप्रमाणे विद्यार्थी संख्या असावी.

कळावे,
दिनांक- ११।७।८६

(सही)
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

पी/एस/यू.

Place before the School Committee for information

दाखल
२१-७-८६